लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

कंट्रक्शन
आमच्याकडे कमर्शियल रेसिडेंशियल बंगलोज अपार्टमेंट दर १६५० चौ. फुटप्रमाणे मटेरियलसह लॉक अँड की प्रोजेक्ट करून दिले जातील. संकल्प इंजीनियर्स
मो. ९३७१५२३९३९

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ५४ वा | शुक्रवार, दि. १३ सप्टेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# सरन्यायाधीश-पंतप्रधान भेट संशयाच्या भोवऱ्यात

## घटनेच्या अनेक तत्वांना दिली तिलांजली

## भेटीवर कायदेतज्ज्ञांनी व्यक्त केली नाराजी

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या घरी जाऊन गणपतीची आरती केली. यावरून मोठा वाद सुरू झाला आहे. फक्त विरोधी पक्षातील नाही तर न्याय क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक लोकांनी यावर नाराजी व्यक्त केली आहे. यावर आता कायदेतज्ज्ञ उल्हास बापट यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

देशाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या घरी गणेशोत्सवानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या घरी जाऊन गणपतीची आरती केल्यानंतर आता अनेक चर्चा रंगू लागल्या आहेत. सरन्यायाधीशांच्या घरी पंतप्रधानांनी गणेशाची आरती केल्याची ही पहिलीच घटना आहे. यावर बोलताना कायदेतज्ज्ञ उल्हास बापट म्हणाले, पंतप्रधान आणि सरन्यायाधीश दोन्ही घटनेचे पद आहेत. घटनेच्या अनेक तत्वांना आता तिलांजली दिली जातेय. घटनेत सगळ्याच गोष्टी लिहल्या नसतात, घटना उत्क्रांत होत गेलेली असते. प्रसिध्दी पासून न्यायाधीशांनी दूर राहावे असे म्हटले आहे. पण याकडे दुर्लक्ष झाले आहे, असे बापट म्हणाले.

सरन्यायाधीशांनी पंतप्रधान यांना बोलावले असेल तर ही चूक आहेच, दुसऱ्या बाजूला मात्र जर पंतप्रधान आपणहून त्यांच्याकडे गेले असतील सरन्यायाधीश यांनी अशी भेट चुकीची आहे हे सांगायला पाहिजे. लोकशाही सुदृढ करण्याची जबाबदारी पंतप्रधान आणि सरन्यायाधीशांवर असते आणि असे काही होत असेल तर ही चूक झाली आहे, असे ही बापट म्हणाले. चुकीच्या वागण्यामुळे आपण संशयाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता आहे, याची जाणीव सरन्यायाधीशांनी ठेवायला हवी, असे ही ते म्हणाले.

देशातील अनेक जेष्ठ वकिलांनी या भेटीवर प्रतिक्रिया दिली आहे. इंदिरा जयसिंह यांनी एक्स वर लिहलेल्या पोस्टवर म्हटले आहे की, सरन्यायाधीशांच्या स्वतंत्र्यावरचा विश्वास उडाला आहे. विरोधकांकडून होणाऱ्या आरोपांवर भाजपने उत्तर दिले आहे. अशा पद्धतीने टीका करणे हे घाणेरड्या विचारांचं लक्षण असल्याचा आरोप चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरन्यायाधीश यांची याआधी देखील अनेक कार्यक्रमात भेट झाली होती. दोन वर्षांपूर्वी संविधान दिवसाच्या कार्यक्रमावेळी, त्यानंतर सप्टेंबर २०२३ मध्ये वकिलांच्या आंतरराष्ट्रीय संमेलनात आणि ऑगस्टमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेला ७५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल भेट झाली होती. मात्र या सर्व भेटी अधिकृत कार्यक्रमातील होत्या.





# सोलापुरातील दुकाने रात्री 10 नंतर बंद!

- पोलिस उपायुक्तांच्या नेतृत्वात रात्रगस्त
- विनाकारण फिरणाऱ्यांवर कारवाई



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील दुकानांसाठी रात्री दहा वाजेपर्यंतच परवानगी असल्याने त्यांना दहानंतर दुकाने सुरू ठेवता येणार नाहीत (अत्यावश्यक सेवेतील दुकाने वगळून), असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. दुसरीकडे उत्सव काळात रात्री दहानंतर विनाकारण रस्त्यांवरून फिरणाऱ्यांवरही पोलिस कारवाई करणार आहेत. कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पोलिसांनी रात्री ९ ते १२ वाजेपर्यंत रात्रगस्त सुरु केली आहे.

सोलापूर शहर उत्सवप्रिय शहर असल्याचे म्हटले जाते. पण, रात्री साडेदहा, अकरानंतर विनाकारण घराबाहेर फिरणाऱ्यांची संख्याही सोलापूर शहरात लक्षणीय आहे. याशिवाय रात्री अकरा, साडेअकरापर्यंत चौकातील दुकाने, हातगाडे, पानटपऱ्या उघड्या असतात. त्यावर आता पोलिसांनी लक्ष केंद्रित केले आहे.

कायदा व सुव्यवस्थेसाठी शहरातील गस्त वाढविली आहे. तीन पोलिस उपायुक्त, चार सहायक पोलिस आयुक्त, सर्व पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी म्हणजेच वरिष्ठ पोलिस निरीक्षक, पोलिस निरीक्षक, सहायक पोलिस निरीक्षक, उपनिरीक्षक यांच्यासह पोलिस अंमलदारांवर त्याची जबाबदारी आहे. याशिवाय वाहतूक पोलिस अधिकारी व अंमलदार देखील विविध रस्त्यांवर रात्री उशिरा वाहनांमधून फिरणाऱ्यांची तपासणी करतील. त्यावेळी बेशिस्तांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे वस्तूंची खरेदी किंवा अन्य कामे रात्री दहापूर्वीच करावी, विनाकारण कोणीही फिरू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. गणपती विसर्जनादिवशी रात्री बारापर्यंत परवानगी असणार असल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**शहर पोलिसांचे नियोजन**

- संपूर्ण शहरात रात्री ९ ते १२ या वेळेत पोलिसांची राहणार गस्त
- शॉप ॲक्टनुसार रात्री दहानंतर शहरातील सर्व दुकाने बंद करावी लागणार
- रात्री ९ ते १० या वेळेत सर्व पोलिस अधिकारी गणेशोत्सव मंडळांना भेटी देतील
- रात्री १० नंतर दुकाने बंद करण्याची कार्यवाही; १२ पर्यंत शहरभर पोलिसांची गस्त
- दररोज एका 'डीसीपीं'वर जबाबदारी

उत्सव काळात विनाकारण रस्त्यांवर फिरणाऱ्या, दंगा- मस्ती करणाऱ्यांवर पोलिस आता कारवाई करत आहेत. शहरातील दुकानांसाठी रात्री दहापर्यंतच परवानगी असून त्यानंतर सुरु राहणाऱ्या दुकानांवर, त्याठिकाणी विनाकारण थांबणाऱ्यांवर देखील कारवाई केली जाणार आहे. पोलिस आयुक्त एम. राज कुमार यांनी त्याची जबाबदारी दररोज एका पोलिस उपायुक्तांवर दिली असून ते स्वतः शहरातील ठिकठिकाणी जाऊन पाहणी करतील.

# देयके द्या, अन्यथा काम बंद आंदोलन

## जलजीवन मिशन कामाच्या ठेकेदारांचा इशारा




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागांतर्गत सुरू असलेल्या जलजीवन मिशनमधील कामांची ठेकेदारांची देयके जिल्हा परिषदेकडे प्रलंबित आहेत. ती येत्या आठ दिवसांत द्या, अन्यथा २० सप्टेंबरपासून काम बंद आंदोलन करणार असल्याची माहिती ग्रामीण पाणीपुरवठा ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष मोतीलाल राठोड यांनी दिली. तसेच याबाबत जिल्हा परिषद प्रशासनाला निवेदन दिल्याचे त्यांनी सांगितले.

जलजीवन मिशनच्या कामांना मुदतवाढ देताना विनादंड मुदतवाढ द्या, जादा दाराच्या निविदांना लवकर प्रशासकीय मान्यता द्या, या कामांसाठी नैसर्गिक वाळू वापरण्याची अट आहे, मात्र, वाळू उपलब्ध होत नाही. कामे पूर्ण होऊनही सुरक्षा रक्कम अजूनही दिलेली नाही, अशा संघटनेच्या मागण्या आहेत. याबाबत संघटनेने बैठक घेतली. त्यात ठेकेदारांनी प्रलंबित देयके न मिळाल्यास काम बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना संघटनेचे अध्यक्ष मोतीलाल राठोड यांच्या नेतृत्वाखाली निवेदन दिले. या निवदेनावर कार्याध्यक्ष आनंद तोडकरी, सचिव राहुल कौलगे-पाटील यांच्या स्वाक्षरी आहेत.

**आता आत्महत्या हाच पर्याय**

जलजीवन मिशनच्या कामांसाठी ठेकेदारांनी व्याजाने रक्कम उभी केली आहे. कामे पूर्ण केली असतानाही जिल्हा परिषद प्रशासनाकडून वेळेत देयके मिळत नाहीत. त्यामुळे ठेकेदार आर्थिकदृष्ट्या अडचणीत आले आहेत. याबाबत सतत पाठपुरावा करूनही देयके मिळत नसल्याने सहनशीलता संपली असून, आमच्यासमोर आत्महत्या हाच पर्याय राहिला आहे. त्यामुळे नाईलाजाने जलजीवन मिशनची कामे बंद करण्याचा निर्णय घ्यावा लागत असल्याचे संघटनेचे अध्यक्ष मोतीलाल राठोड यांनी सांगितले.

# 'सुदीप, माझ्यासोबत आजोबा झाले, काका झाले, आता तुला विधानसभेत पाहायचे आहे'- बाळासाहेब थोरात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र काँग्रेस सेवादल यंग ब्रिगेडचे अध्यक्ष सुदीप चाकोते यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि विधानसभेतील गटनेते बाळासाहेब थोरात यांची संगमनेर येथील त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान, सोलापूर शहर उत्तर आणि सोलापूर शहरातील राजकीय परिस्थितीबाबत विस्तृत चर्चा झाली. सुदीप चाकोते यांनी शहर उत्तर हा काँग्रेसचा बालेकिल्ला असल्याचे आणि येत्या काळात हा मतदारसंघ काँग्रेस पक्षासाठी आणखी मजबूत करण्याची गरज असल्याचे थोरात यांच्या निदर्शनास आणून दिले.



सत्कार समारंभात, थोरात यांचा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार मिळाल्याबद्दल आणि काँग्रेस कार्यकारिणी समितीचे (CWC) सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल सुदीप चाकोते यांनी शाल, श्रीफळ, आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. सत्कारानंतर, थोरात यांनी भारत जोडो यात्रेतील आठवणींना उजाळा दिला आणि या ऐतिहासिक यात्रेच्या अनुभवांची माहिती दिली.

यावेळी थोरात यांनी चाकोते कुटुंबाच्या काँग्रेस पक्षासाठी दिलेल्या योगदानाचे विशेष कौतुक केले. त्यांनी सांगितले, "सुदीप, तुझ्या आजोबांसोबत मी काम केले, तुझ्या काकांसोबतही अनेक वर्षे पक्षासाठी कार्य केले, आणि आता तू पक्षाचे नेतृत्व करताना तुला विधानसभेत पाहायचे आहे." त्यांनी सुदीप चाकोते यांच्या कामगिरीचे विशेष उल्लेख करत त्यांच्याकडून आगामी काळात आणखी मोठ्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची अपेक्षा व्यक्त केली.

तसेच, सोलापूर शहर उत्तर मतदारसंघात काँग्रेस पक्षाची पकड अधिक बळकट करण्यासाठी आणि स्थानिक जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची चर्चा करण्यात आली. थोरात यांनी महाविकास आघाडीत ही जागा नक्की पुन्हा काँग्रेसकडे खेचून आणू, अशी ग्वाही दिली.

बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनामुळे आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाच्या विजयासाठी आणि सोलापूर शहर उत्तरमध्ये पक्षाच्या बळकटीसाठी काम करण्याचा दृढ निर्धार करण्यात आला.

# पंढरपूर येथे होणार 'स्वराज्य संग्राम' चे पहिले अधिवेशन

## १५ सप्टेंबरला होणार अधिवेशन, 'स्वराज्य संग्राम' संपूर्ण महाराष्ट्रात लढा उभा करेल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्श शिवनितीचा विचार डोळयासमोर ठेवून दि.०१ सप्टेंबर २०२४ रोजी कराड येथे प्रितीसंगमावर महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या समाधीचे दर्शन घेऊन आम्ही "स्वराज्य संग्राम" या संघटनेची घोषणा केली. अशी माहिती तानाजीराव शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.




खाली नमूद केलेल्या भूमिकांनुसार ह्स्वराज्य संग्राम" या संघटनेची संपूर्ण महाराष्ट्रात उभारणी केली जाणार.

१) देशात समान नागरी कायदा लागू झाला पाहिजे.

२) छत्रपती शिवाजी महाराजांचे मुंबई येथे अरबी समुद्रात आंतरराष्ट्रीय पातळीचे स्मारक त्वरित उभारले पाहिजे.

३) मराठा समाजाला टिकणारे आरक्षण मिळाले पाहिजे.

४) महाराष्ट्रातील शेतकरी वाचवण्यासाठी एकवेळ संपूर्ण कर्जमाफी शासनाने केली पाहिजे.

५) महाराष्ट्रात वाढत असलेल्या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी "स्वराज्य संग्राम" लढा उभा करेल.

६) छत्रपती शिवराय व तमाम महाराष्ट्राचे दैवत असलेल्या रायगडावरील जगदिश्वराच्या मंदिराचा शासनाने जिर्णोध्दार केला पाहिजे.

७) महाराष्ट्रात सुरु असलेली कंत्राटी पध्दतीवरील भरती बंद करुन महाराष्ट्रातील युवकांना न्याय देण्यासाठी त्वरित सर्व विभागात रितसर नोकर भरती सुरु केली पाहिजे.

८) महिलांच्या संरक्षणासाठी व विकासासाठी कायम स्वरुपी उपाययोजना शासनाने केल्या पाहिजेत.

९) सारथी संस्थेची व्याप्ती शासनाने वाढवली पाहिजे.

१०) आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाने थेट कर्ज योजना सुरु केली पाहिजे.

वरील मुद्यांची पूर्तता करण्यासाठी "स्वराज्य संग्राम" संपूर्ण महाराष्ट्रात लढा उभा करेल. त्यासाठी जनजागृती, सभा, मेळावे, संपर्क यात्रा, धरणे आंदोलन यांसारख्या सनदशीर मार्गाने वाटचाल करुन महाराष्ट्रातील समाजाला न्याय मिळवून देण्याचे कार्य यापुढे "स्वराज्य संग्राम" करेल.

येत्या १५ सप्टेंबर २०२४ रोजी श्री. क्षेत्र पंढरपूर येथे 'स्वराज्य संग्राम' चे पहिले अधिवेशन भरविण्यात आले. अधिवेशनास महाराष्ट्राच्या सर्वच जिल्हयातून हजारोंच्या संख्येने प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. सदर अधिवेशनात संघटनात्मक बांधणी, पदाधिकारी निवड व वरील विषयांवर अनेक महत्वपूर्ण ठराव करुन "स्वराज्य संग्राम"ची पुढील दिशा निश्चित करण्यात येईल. असे 'स्वराज्य संग्राम' चे अध्यक्ष तानाजीराव शिंदे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस तानाजी जाधव, ॲड आकाश देढे, गंगाधर गायकवाड, सागर गायकवाड आदी उपस्थित होते.

# 'मुख्यमंत्री योजनादूत' उपक्रमासाठी अर्ज करण्याची शुक्रवारी शेवटची संधी

## आतापर्यंत 1 लाख 20 हजाराहून अधिक उमेदवारांची नोंदणी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादुत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमासाठी अर्ज करण्याची शुक्रवार दि. १३ सप्टेंबर २०२४ ही शेवटची तारीख आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रुपए मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. या उपक्रमासाठी आतापर्यंत १ लाख २० हजारांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अजासीबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. उद्या शुक्रवार दि.१३ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www. mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. योजनादूत पोर्टलवर ज्या उमेदवारांनी नोंदणी केली आहे अशा उमेदवारांनी Apply बटन दाबून अर्ज Submit करायला विसरू नये. तरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

# उजनी धरणाचे 16 दरवाजे बंद ! कॅनॉलचे पाणी 10 ऑक्टोबरपर्यंत सुरु राहणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** उजनी धरण सध्या १०४ टक्के (११९.३० टीएमसी) भरले असून पूर नियंत्रणासाठी धरणातून ४ ऑगस्टपासून भीमा नदीत पाणी सोडले जात आहे. मागील ३७ दिवसांत धरणातून तब्बल ९३ टीएमसी पाणी नदीत सोडण्यात आले.

पण, काही दिवसांपासून पाऊस बंद झाल्याने भीमा नदीत सोडले जाणारे पाणी आज बंद करण्यात आले आहे. धरणाचे १६ दरवाजे बंद करण्यात आले आहेत.

सध्या उजनीतून सीना-माढा उपसा सिंचन योजनेसाठी १७५ क्युसेक, दहिगाव उपसा सिंचन योजनेसाठी ८० क्युसेक, बोगद्यातून २०० क्युसेक, कालव्यातून (कॅनॉल) १६०० तर विद्युत प्रकल्पासाठी १६०० क्युसेक पाणी सोडले जात आहे. नदीतून पाणी सोडणे आता पूर्णपणे बंद झाले आहे. सध्या धरणातून सोडले जाणारे पाणी साधारणतः १० ऑक्टोबरपर्यंत जैसे थे राहणार आहे. यंदा जिल्ह्यात चांगला पाऊस झाला असून विहिरी, गाव तलाव, मध्यम, लघू प्रकल्पात समाधानकारक पाणीसाठा आहे. त्यामुळे आता जानेवारीअखेर किंवा फेब्रुवारीत शेतीसाठी पहिले आवर्तन सोडले जाईल. त्यानंतर उन्हाळा संपेपर्यंत आणखी दोन आवर्तने शक्य आहेत. धरणातील पाणीसाठा उणे १५ ते २० टक्के झाल्यावर कॅनॉलमधून पाणी सोडता येत नाही. यंदाच्या पावसाळ्यात उजनी ओव्हरफ्लो झाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून त्यांची उन्हाळ्यातील चिंता दूर झाली आहे.



## संपादकीय

# विमा करबोजा

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली जीएसटी काउन्सिलची नियमित बैठक दोन दिवसांपूर्वी पार पाडली. मात्र, त्या बैठकीत विम्यावरील जीएसटी कमी करण्याबाबत किंवा तो रद्द करण्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. या विषयाची चर्चा करण्यासाठी एका समितीची नियुक्ती करण्यात आली असून नोव्हेंबरमध्ये होर्णाया जीएसटी काउन्सिलच्या मिटिंगमध्ये याबाबत निर्णय घेतला जाईल, असे संकेत जरी देण्यात आले असले तरी विम्यासारख्या महत्त्वाच्या विषयावर असलेला कराचा बोजा लवकरात लवकर कमी करावा, असे सरकारला वाटत नाही याचेच आश्चर्य वाटते.

सध्याच्या जीएसटी करप्रणालीप्रमाणे आयुर्विमा असो किंवा जनरल प्रकारातील विमा असो कोणत्याही विम्याची खरेदी करत असताना विमा हप्त्यावर 18 टक्के जीएसटी भरावा लागत आहे. हे पैसे ग्राहकाच्या खिशातूनच जात आहेत. मुळात गेल्या काही वर्षांमध्ये आयुर्विमा असो किंवा जनरल विमा असो याबाबत देशातील नागरिकांमध्ये जागरूकता वाढत असताना या विषयाला अधिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने विम्यावरील कराचा बोजा कमी करणे किंवा तो कर अजिबातच काढून टाकण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्याची गरज होती. एकतर आयकरप्रणालीमध्ये नवी आणि जुनी करप्रणाली आणून नव्या करप्रणालीमध्ये विम्यासह कोणत्याही गुंतवणुकीचा फायदा गुंतवणूकदारांना मिळत नसतानाही लाखो करदाते दरवर्षी जीवनविमा किंवा आरोग्य विमा किंवा वाहन विम्याचे हप्ते दरवर्षी भरतच राहतात.

खरेतर एकीकडे आयकर रिटर्न भरत असताना पूर्वी जी विम्यातील गुंतवणुकीची करसवलत मिळत होती ती नव्या करप्रणालीमध्ये रद्द करण्यात आली असल्याने जीएसटीच्या माध्यमातून किमान विमा हप्त्यावरील जीएसटी कमी करण्याचा निर्णय सरकारने प्राधान्याने घेण्याची गरज होती. पण सरकारच अद्याप या विषयाबाबत गोंधळात आहे, असे दिसते. कारण कोणत्या प्रकारच्या विम्यावरील जीएसटी कमी करायचा किंवा अजिबात काढून टाकायचा याबाबत सरकारच्या मनात स्पष्टता नाही. ती स्पष्टता निर्माण करण्यासाठी सरकारने या समितीची नियुक्ती केली आहे. या समितीने ठरलेल्या कालावधीमध्ये आपला अहवाल दिला तरच नोव्हेंबरमध्ये होर्णाया जीएसटी काउन्सिलच्या बैठकीमध्ये एखादा सकारात्मक निर्णय होऊ शकतो. खरेतर एवढाही विचार करण्याची गरज नव्हती.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यापूर्वीच या विषयाला तोंड फोडले होते. विम्यावरील जीएसटी काढूनच टाकावी, अशी मागणी केली होती. गेल्या काही वर्षांमध्ये विमा या विषयाबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये जी जागरूकता निर्माण झाली आहे त्यामुळे विमा क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जात आहे. खासगी क्षेत्रातही अनेक विमा कंपन्या कार्यरत असल्याने मोठ्या प्रमाणावर विम्याचा विषय सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचला आहे. नेहमीच्या प्रकारातील जीवनविमा असो किंवा संपूर्ण कुटुंबाला आरोग्याच्या खर्चाचे संरक्षण देणारा आरोग्य विमा असो किंवा वाहनांना संरक्षण देणारा वाहन विमा असो देशातील प्रत्येक कुटुंबातील नागरिक कधी ना कधी यापैकी कोणत्या ना कोणत्या विम्याच्या संपर्कात येत असतो.

देशात एकीकडे आरोग्य विमा घेण्याचे प्रमाण वाढल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यानंतर उपचाराची अवाढव्य बिले कशी भरायची ही जी काळजी होती तीसुद्धा आता कमी झाली आहे. सरकारी कार्यालयीन पातळीवर असो किंवा खासगी कंपन्यांमध्ये असो प्रत्येक कर्मचार्याचा अशा प्रकारे आरोग्य विमा उतरवला जाऊ लागला आहे. या व्यतिरिक्त भविष्यातील खचार्चा विचार करून जीवनविमा घेण्याचे प्रमाणही वाढत चालले आहे. वाहन खरेदी करताना त्याचा विमा घेतल्याशिवाय वाहन रस्त्यावरच येऊ शकत नसल्याने त्याचे प्रमाणही वाढत चालले आहे. याव्यतिरिक्त पीकविमा असेल किंवा इतर अनेक प्रकारचे विमा असतील त्यांची बाजारपेठ गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या बाजारपेठेच्या निमित्ताने सरकारला उत्पन्नाचे एक साधन दिसत असल्यानेच विम्यावर 18 टक्के जीएसटी लावला जात आहे.

सरकारच्या तिजोरीमध्ये कोट्यवधी रुपये या कराच्या निमित्ताने पडत असले, तरी आर्थिक बाजू भक्कम करण्याच्या नादात सामाजिक बाजू कमकुवत होण्याचा धोका लक्षात घ्यायला हवा. सर्वसामान्य नागरिक विम्याच्या निमित्ताने अब्जावधी रुपयाची गुंतवणूक जर या क्षेत्रामध्ये करत असतील, तर त्यांच्यावरील कराचा बोजा कमी करण्याचा निर्णय सरकारने कोणताही जास्त विचार न करता घेण्याची गरज आहे. पण सरकारकडून विनाकारणच हा विषय ताणला जात आहे. उत्पन्न कमी होण्याचीच भीती सरकारला असेल, तर इतर अनेक लक्झरी आणि चैनीच्या वस्तूंवर कराचा बोजा वाढवून सरकार ही भरपाई करू शकते. पण सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन आयुष्याचा एक भाग असलेल्या विमा या सेवेवरील जीएसटी कमी करण्याचा किंवा संपूर्णपणे काढून टाकण्याचा निर्णय सरकारला नजीकच्या कालावधीमध्ये घ्यावाच लागणार आहे.

मुळात जो निर्णय कधी ना कधी घ्यायचाच आहे तो पटकन घेऊन सरकारने सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्याचे काम करायला हवे. पण सध्या तरी सर्वसामान्य नागरिकांना नोव्हेंबर महिन्यामध्ये होर्णाया जीएसटी काउन्सिलच्या मीटिंगपर्यंत या निर्णयासाठी वाट पाहावी लागणार आहे.

# २५ वर्षानंतर पाकची कबुली

जी गोष्ट पाकिस्तान आजवर नाकारीत आला ती गोष्ट पाकिस्तानने २५ वर्षानंतर का होईना अखेर मान्य केली. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल असीम मुनीर यांनी पाकिस्तानी सैनिक दिनाच्या निमित्ताने पाकिस्तानी सैनिकांना संबोधित करताना मान्य केली. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल असीम मुनीर यांनी पाकिस्तानी सैनिकांना संबोधित करताना १९९९ साली झालेल्या कारगिल युद्धात मारले गेलेल्या पाकिस्तानी सैनिकांच्या बलिदानाची आठवण काढत त्यांना श्रध्दांजली वाहिली आणि २५ वषार्पासून पाकिस्तान जी गोष्ट नाकारीत आलाय त्याची न कळत कबुली दिली. १९९९ साली भारताचे तत्कालीन पंतप्रधान अटबिहारी वाजपेयी यांनी पाकिस्तानशी मैत्री करण्यासाठी मैत्रीचा हात पुढे केला. दोन्ही देशात पन्नास वर्षांपासून सुरू असलेला तणाव कमी करण्यासाठी वाजपेयींनी प्रामाणिक प्रयत्न केले. दोन्ही देशांचे संबंध सुधरावेत म्हणून त्यांनी दिल्ली लाहोर बस सेवा सुरू केली . दोन्ही देशात सौहादार्चे वातावरण निर्माण झाले आणि कटुता कमी झाली असे वाटत असतानाच पाकिस्तानने आपला मूळ रंग दाखवला आणि भारताचा विश्वासघात केला. १९९९ च्या कडाक्याच्या थंडीत जम्मू काश्मीर मध्ये बर्फ पडत असल्याचा फायदा घेऊन कारगिल मधील उंचावर असलेल्या कारगिलमध्ये घुसखोरी करून बंकर उभारले आणि त्यात पाकिस्तानी सैनिकांना घुसवले. त्यांनी कारगिलच्या बऱ्याच भागात अतिक्रमण केले आणि तो भूभाग बळकावत भारतीय सनिकांवर आक्रमण केले. भारतीयांसाठी हा मोठा धक्का होता कारण पाकिस्तान असा विश्वासघात करेल असे कोणालाच वाटले नव्हते शिवाय कारगिल मधील परिस्थिती भारतीयांसाठी अनुकूल नव्हती. शत्रुसैन्य उंचीवर असल्याने शत्रू सैन्याच्या गोळीबाराचा मुकाबला करत आल्या सैनिकांना पहाडावर चढावे लागत होते. भारतीय सैन्य अतिशय विपरीत परिस्थितीत शत्रूला धैर्याने तोंड देत होते पण परिस्थिती अनुकूल नव्हती अखेर केंद्र सरकारने हवाई दलाला पाचारण केले. हवाई दलाने लेझर बॉम्बने पाकिस्तानी सैनिकांचे बंकर उध्वस्त केले. कॅप्टन विक्रम बात्रा व त्यांच्या युनिटने मोठी मर्दुमकी गाजवून पाकड्यांना भारताबाहेर हुसकावून लावले. दोन महिने चाललेल्या या युद्धात पाकिस्तान नामोहरम झाला. या युद्धात भारताचे अनेक जवान शहीद झाले. भारताने पाकड्यांना कारगिल मधून हुसकावून लावल्यावर भारतीय सैन्य पाकिस्तानमध्ये घुसेल अशी भीती वाटू लागल्यावर पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी थेट अमेरिका गाठत अमेरिकेला मध्यस्ती करण्याची विनंती केली. अमेरिकेच्या मध्यस्ती नंतर भारताने युद्ध थांबवले. या युद्धात पाकिस्तानची नाचक्की झाली पण पाकिस्तानने कारगिल मध्ये घुसखोरी करणारे पाकिस्तानी सैनिक नसून मुजाहिदीन असल्याची आरोळी ठोकली. आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तान कायम हेच सांगत आला की कारगिल मध्ये पाकिस्तानी सैन्य नव्हतेच भारताने मात्र त्याचा कायम प्रतिवाद करत घुसखोरी करणारे पाकिस्तानी सैन्यच असल्याची ठाम भूमिका घेतली. पाकिस्तान मात्र हे नाकारीत राहिला. पण म्हणतात ना सत्य केंव्हा ना केंव्हा तरी मान्य करावीच लागते. आता २५ वषार्नंतर का होईना पाकिस्तानने सत्य मान्य केले. पाकिस्तान विश्वास घातकी आहे असे भारत आंतरराष्ट्रीय समुदायाला जे सांगत आलाय ते २५ वर्षानंतर का होईना पण खरे ठरले.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# सीताराम येचुरी : राजकीय कारकीर्द कशी होती ?

सीताराम येचुरी यांनी १९७५ च्या आणीबाणीच्या काळात सरकारविरोधी आंदोलने केली आणि यासाठी त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला होता. त्यानंतर ते CPI(M) चे एक महत्त्वाचे नेते बनले. २००५ मध्ये त्यांनी राजकीय कार्यकारिणी समितीमध्ये प्रवेश केला आणि २०१५ मध्ये पहिल्यांदा पक्षाचे सरचिटणीस झाले. त्यांच्या नेतृत्त्वाखाली पक्षाने देशातील विविध आंदोलने आणि कामगारांच्या हक्कांसाठी संघर्ष केला आहे. त्यानंतर २०१८ आणि २०२२ साली त्यांची पुन्हा याच पदासाठी फेरनियुक्ती करण्यात आली होती.



### राज्यसभेचे खासदार ते यूपीए सरकारमधील महत्त्वाचे नेते

सीताराम येचुरी यांनी २००५ ते २०१७ दरम्यान राज्यसभेत पक्षाचे प्रतिनिधित्व केले. संसदेत त्यांनी विविध मुद्द्यांवर, विशेषतः कामगार, गरीब आणि मध्यमवर्गीयांचे अधिकार आणि समस्यांवर आवाज उचलला. त्यांची संसदेतील अनेक भाषणे गाजली. येचुरी कोणती भूमिका मांडतात याकडे फक्त डाव्या चळवळीतीलच नाही तर इतर पक्षाच्या नेत्यांना आणि राजकीय अभ्यासकांनाही कुतूहल असे. श्रमिक, कामगारांचे प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी त्यांनी संसद आणि रस्त्यावरची लढाई नेहमीच लढली. धर्मनिरपेक्षतेच्या मुद्द्यावर कायम भूमिका घेतली आणि संघ परिवाराच्या हिंदुत्ववादी विचारसरणीला नेहमी विरोध केला.

### भाजपा आणि संघाचे कडवे टीकाकार

भाजपा आणि संघावर काँग्रेसपेक्षाही अधिक कडवी टीका सीताराम येचुरी यांनी केलेली आहे. लोकसत्ताच्या लोकसंवाद या कार्यक्रमात राम मंदिरावर बोलताना ते म्हणाले होते, 'महात्मा गांधी किंवा राम मनोहर लोहिया यांनी रामाचा उल्लेख केला असला तरी तो राजकारणासाठी नव्हता. त्यामागे रामराज्य किंवा रामाची पूजा करणे हा उद्देश होता. भाजपकडून रामाचा नेहमी राजकीय फायद्यासाठीच वापर केला गेला. यामुळेच भाजपची मंडळी 'जय श्रीराम' असाच उल्लेख करतात. ते 'जय सियाराम' असे म्हणत नाहीत. भाजप किंवा रा. स्व. संघाचे हिंदूत्व हे नेहमीच उच्चवर्णीयांचे किंवा ब्राह्मणवादी राहिले आहे. त्यांच्या हिंदूत्वाचा सारा ढाचा हा मनुस्मृतीवर आधारित आहे. समाजाची रचना कशी असावी याचे स्वरूपही संघ परिवाराने मनुस्मृतीनुसारच केले आहे. महिलांना कशी वागणूक दिली जाते हे त्याचेच उदाहरण आहे. खाप पंचायतींना अजूनही प्रोत्साहन दिले जाते. मनुस्मृतीला एक प्रकारे बळ देण्याचे कामच या सरकारने केले आहे. उच्चवर्णीयांचेच हित जपले जाते हेसुद्धा अनुभवास आले आहे.'

# सोलापूर रेल्वे स्थानकावर सीपीआर आणि प्राथमिक उपचार प्रशिक्षण आयोजित





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर रेल्वे स्थानकावर सीपीआर आणि प्राथमिक उपचार प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. सोलापूर रेल्वे विभागाने डॉ. कोटणीस रेल्वे मेमोरियल हॉस्पिटल, अश्विनी हॉस्पिटलची ब्लू कोड टीम आणि नर्सिंग स्टाफ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 12 सप्टेंबर, 2024 रोजी आयोजित करण्यात आले होते. सोलापूर रेल्वे स्थानकावरील सर्व प्रवाश्यांसाठी हे उपचार प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये प्रामुख्याने सी-कार्डियो पल्मोनरी रिसिटेशन (CPR) तंत्र, स्वयंचलित बाह्य डिफिब्रिलेटर (AED) वापर, प्राथमिक प्रथमोपचार प्रक्रिया, गुदमरल्यासारखे वाटल्यावर श्वाशोश्वास पूर्ववत करण्याचे तंत्र यांचे प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणाचा प्राथमिक उद्देश कर्मचाऱ्यांना आवश्यक जीवनरक्षक कौशल्यांनी सज्ज करणे होता, त्यामुळे ते आपत्कालीन परिस्थितींमध्ये प्रभावीपणे प्रतिसाद देऊ शकतील. ही योजना विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या आणि प्रवाशांच्या कल्याणाची खात्री करण्याच्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेचा एक भाग आहे.

प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अग्रस्थानी आपत्कालीन प्रतिसादाचा व्यापक अनुभव असणारे डॉ विनोद यांनी केले. तसेच डॉ.जयश्री मानभावी (ड्युटी मेडिकल ऑफिसर) यांच्या नेतृत्वाखाली अश्विनी हॉस्पिटल ब्लू कोड टीम, नर्सिंग स्टाफने आणि त्यांच्या इतर सहकार्यांनी परिश्रम घेतले. जवळपास 100 पेक्षा जास्त रेल्वे प्रवासी, रेल्वे स्थानकावरील रेल्वे कर्मचारी आणि आरपीएफ कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता. शिवाय त्याचे प्रात्यक्षिक हि यावेळी करून दाखविण्यात आले. सहभागींनीही सक्रियपणे प्रत्यक्षात सराव केला आणि CPR तंत्राबद्दल आपली समज दाखवली.

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने आपल्या कर्मचाऱ्यांच्या सततच्या विकासासाठी आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी वचनबद्ध आहे, याची खात्री करत की ते आपल्या कर्तव्यांच्या दरम्यान उद्भवलेल्या कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी तयार आहेत. सदरच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल गंबरे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्य चिकित्सा अधीक्षक डॉ. आनंद कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अण्णाराव खंडागळे आदर्श कलाशिक्षक पुरस्काराने सन्मानीत

## कलाशिक्षक खंडागळे यांचे कार्य कौतुकास्पद : अजयकाका डोंगरे



**कुर्डुवाडी (कटूसत्य वृत्त):-** लिटिल मास्टर इंग्लिश मीडियम स्कूल, शेटफळ येथील कलाशिक्षक नागनाथ खंडागळे माढा. गेल्या दहा वषार्पासून कला क्षेत्रात उल्लेखनीय काम करत आहेत. या कामाची दखल घेत त्यांना स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी महासंघ महाराष्ट्र राज्य व मंत्रालय समन्वय समिती मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिना निमित्त राज्यस्तरीय आदर्शकला शिक्षक पुरस्कार शिक्षण अधिकारी सचिन जगताप यांच्या हस्ते मिळाल्याबद्दल लिटिल मास्टर इंग्लिश मीडियम स्कूलचे मार्गदर्शक अजयकाका डोंगरे यांच्या हस्ते त्यांना ग्रंथ, लेखणी, बुके देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी प्राचार्य फराह शेख अभिनंदन केले. या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन संस्थेचेसंस्थापक अध्यक्ष विजयराजदादा डोंगरे, कार्यालयीन अधीक्षक चेतन कोरके, श्रीकांत पुजारी, संतोष कवडे, रवीकिरण वसेकर, गजानन क्षिरसागर, स्वप्नील चव्हाण, जयसल पवार, शुभम डुचाळ, लक्ष्मी वागज, सुषमा भोसले, योगिनी चांदेकर, अमृता वाघमारे, अंजना दाडे, शुभांगी ढोले, सपना भोसले. व शिक्षक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कला व शैक्षणिक सामाजिक क्षेत्रातून होत आहे.

## प्रबोधन

# अंधश्रध्दा निर्मूलन

सुखकर्ता व्हावे । दुःखहर्ता व्हावे
अपणाची व्हावे । बुध्दिदाता

भारताच्या संस्कृतीचा प्रारंभ गणेशभक्तीनेच झाला असावा, म्हणून तर गजानना श्री गणराया आधी वंदू तुज मोरया, अशी त्याला प्रार्थना केली जाते. ह्यभगवद्गीता' चा पहिला श्लोक धर्मश्रेत्रं कुरूक्षेत्रं असा गणेशवंदनविरहित असला, तरी 'भावार्थदीपिका' ऊर्फ ज्ञानेश्वरीची पहिली ओवी ओम नमो जी आद्या अशी गणेशवंदनेने सुरू करून संत ज्ञानेश्वरांनी प्रारंभीच्या एकोणीस ओव्यांतून गणेशाचं भव्य रूपक शब्दबद्ध केलं आहे. ते लिहितात, देवा तूचि गणेशु । सकलमतिप्रकाशु । म्हणे निवृत्तीदासु । अवधारिजो जी। गणपती हा शब्दब्रह्म आहे. स्मृतिग्रंथ हे त्याचे अवयव आहेत. अठरा पुराणं हे अलंकार, काव्यनाटकं ह्या रुणझुणणाऱ्या घंटिका, व्यासवचनं ही मेखला, षट्दर्शनं ही त्याची आयुधं आहे. बौद्धमत हा त्याचा खंडित दात आहे. वेदान्त हा मोदक तर धर्मप्रतिष्ठा हा त्याचा अभयहस्त आहे. दशोपनिषदांची सुंगधी फुलं त्याला वाहिली आहेत. ओम ह्या आद्यत्वदर्शक संकेताक्षरात अ, ऊ आणि म असे जे शब्दरूप आहे तो गणेश आहे. ज्ञानेश्वरांनी ग्रंथारंभी श्री गणेशाय नमः म्हटलं आणि त्यानंतरच्या संतांनी हाच 'ओम' संप्रदाय निष्ठापूर्वक सुरू ठेवला. आज गणेशभक्तीच्या समुद्राला जी भरती आलेली आहे, ती पुराणपोथ्या, ज्ञानेश्वरीतून आलेली आहे. शिवाय अनेक संप्रदायांतून, लोककथांमधून ती आली आहे.

संत तुकारामांनी आपल्या पूर्वाश्रमी गणेशस्तुतीचे अभंग लिहिले-

करू प्रथम नमन। वंदू देव गजानन ।
सर्व सिद्धींचा तू दाता । नाना विघ्ने निवारिता ।
देव गणांचा गणपती । तुका म्हणे राहो चित्ती ॥

पण तुकाराम हे विठ्ठलाचे एकनिष्ठ भक्त होते. डॉ. अनिल गवळी तुकोबांच्या गणेशभक्तीच्या संदर्भात म्हणतात, 'तुकाराम एका पंढरीनाथाशिवाय आणि रखूमाईवाचून कोणाला अगदी गणेशालाही ईश्वरत्व देण्यास तयार नाहीत म्हणून ते म्हणतात,

गणोबा विक्राळ । लाडू मोदकांचा काळ ।
शेंदरी ही देवी-दैवते । कोण ती पूजी भुतेखेते ॥
बळिया माझा पंढरीराव । जो या देवांचाही देव।

स्वतः तुकोबांनीच खुलासा करताना म्हटलंय,
तुका म्हणे पाही । विठ्ठल गणपती दुजा नाही ।

अर्थात, विठ्ठलातच त्यांनी गणेशदर्शन घेतलं.

गणपतीला मंगलमूर्ती म्हटलं जातं. मंगळ ह्या तापग्रहाचं तो प्रतीक आहे. मंगळ हा विघ्नं आणणारा, संकटं निर्माण करणारा ग्रह म्हणून ज्योतिष्यांनी म्हटलं, आणि एका अंधश्रद्धेचा, लोकभ्रमाचा प्रारंभ गणेशपूजेने झाला. आपल्या शेवटच्या कीर्तनात पुरोगामी संत गाडगेबाबा म्हणतात, ह्यआपण गणपती मांडता, ही देवाची भक्ती नाही. ही एक रूढी पडून गेली. आणताना बँड लावता, आरत्या करता आणि शेवटच्या दिवशी त्याला पाण्यात बुडवून मारता. ही भक्ती नाही. ही रूढी सोडा.' लोकांनी गाडगेबाबांचं कीर्तन ऐकलं, प्रभावितही झाले. पण चार-सहा दिवसांनी पुन्हा कुत्र्याच्या शेपटासारखी लोकांची स्थिती झाली. घरी गणपती आणले, बँड - फटाके - आरास - आरत्या सारं करू लागले. गणपतीसाठी कुणी एकवीस दुर्वा वाहाण्याचा संकल्प केला; तर कुणी एकशे आठ; त्यांचा मत्सर वाटून कुणी लाख दुर्वा वाहाण्याचा संकल्पामागे लागले. अशा वेड्या भक्तांना आवरण्यासाठी समाजसुधारक वि.दा. सावरकर पुढे सरसावून म्हणतात, 'गणपतीला लाख दुर्वा वाहाण्याचा संकल्पही धन्यच आहे. तासन्‌तास एकेक काडी खुडायची आणि तो भारा गणपतीच्या डोक्यावर वाहून त्याला गुदमरून टाकायचं. कशासाठी हे गवत रचायचं ? गणपती गवत का खातो ? ही व्रतं की विटंबना ?'

पूर्वी गणेशभक्ती मयार्देत होती. गणपती घरोघरी असायचे. तो त्रास नको म्हणून लोकमान्य टिळकांनी सामाजिक पातळीवर गणेशपूजन आणलं. राष्ट्रसंत तुकडोजी त्याविषयी सांगतात,

पूर्वी घरोघरी गणेशोत्सव । नाना रूढींचे उपद्रव।
लोकमान्यांनी आणलं महत्त्व। राष्ट्रीय रूपे तयासी ॥
गावाचा एकचि गणपती । सर्वांसाठी कार्यक्रम होती ।
जेणे वाढेल राष्ट्रीय वृत्ती । ऐसी असावी धारणा।।

पण समाज उच्छृंखल असतो. रूढीमूढ असतो. लोकांनी घरोघरीही गणपती पूजले आणि चौकात, मैदानात आणि कॉलनीतही गणपती बसवून लोकमान्यांनी कपाळाला हात लावावा, असा अनर्थ सुरू केला. भाविकतेने पुरागामीपणावर मात केली. ह्या रूढिजन्य धार्मिकतेवर उपाय सांगताना डॉ. श्रीराम लागू म्हणतात, 'जोपर्यंत देव ही कल्पना आम्ही लोकांच्या डोक्यातून उखडून टाकत नाही, तापेर्यंत खऱ्या अर्थाने अंधश्रद्धा निर्मूलन होणार नाही.'

अंधश्रद्धा निर्मूलनाचं फार मोठं काम डॉ.नरेंद्र दाभोलकर यांनी समाजहितासाठी गेली ३० वर्ष संघटनात्मकरीत्या केलं. समाजाचं आरोग्य लक्षात घेऊन हवाप्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनिप्रदूषण टाळणाऱ्या गणेशात्सवाचा आग्रह त्यांनी धरला. त्यांनी पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाची पत्रकं गावोगावी वाटली. विसर्जित गणपती व निर्माल्य दान करा हा उपक्रम सुरू केला. गणेशमूर्ती विसर्जनाबाबत नागपूर महानगरपालिकेने अंमलात आणलेल्या पयार्याची, उच्च न्यायालय मान्यताप्राप्त माहिती लोकांपर्यंत पोहोचवली. कोल्हापूर अंधश्रद्धा निर्मूलन समितीने १९९२ मध्ये पाण्यात टाकल्या जाणाऱ्या निर्माल्याचं दान घेण्यास प्रारंभ केला. त्यापासून खत तयार करण्यात येऊ लागलं. १९९८पासून एक पाऊल पुढे टाकून मूर्तीचं दान घेण्यास सुरुवात केली. महाराष्ट्रात एक कोटी कुटुंबांत गणपतीमूर्ती आणली जाते. त्यामुळे सुमारे दोन कोटी किलो प्लास्टर ऑफ पॅरिस नदी, तलाव, विहिरीत टाकून प्रचंड जलप्रदूषण होतं. रंगातून विषारी द्रव्यं पाण्यात जाऊन ते पिण्यास धोकादायक बनतं. ते टाळण्यासाठी निर्माल्य दान, मूर्तिदान आणि एक गाव एक गणपती, असे अत्यंत क्रांतिकारक उपक्रम डॉ. दाभोलकरांनी सुरू करून समाजहिताचा क्रांतिकारक पायंडा पाडला. वृत्तपत्रांनी या क्रांतीला प्रोत्साहन दिलं, मान्यता दिली आणि अद्भुत लोकजागरण घडवण्यात आपला क्रियाशील सहभाग नोंदवला. एव्हाना महाराष्ट्रातील अनेक नगरपालिकांनी विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची सोय केली आहे. २३ जिल्ह्यांतील सहा हजार सातशे गावांत एक गाव एक गणपती झाला आहे. ही समाजक्रांती सामान्य नाही.

डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी जसे बुद्धिप्रामाण्यवादास धरून एक गाव-एक गणपती, मूर्तिदान, निर्माल्यदान असे पर्यावरणरक्षक उपक्रम हाती घेतले, तशाच काही विधायक समाजहितकरक्षक सूचनाही त्यांनी केल्या आहेत. आज वर्गणी गोळा करणारे कार्यकर्ते हा लोकांचा आणि व्यावसायिकांचा- दुकानदारांचा डोकेदुखीचा विषय झाला आहेत. राजकारण्यांची तर ती मजबुरी आहे. या पैशांचा खर्च विसर्जनाच्या मिरवणुकीतील मद्यपानाकडे केला जातो. नरेंद्र दाभोलकर म्हणत, 'एकीकडे द्राक्ष संस्कृती जोपासणारी फ्रान्ससारखी राष्ट्र मद्यपान कमी करीत आहेत आणि दुसरीकडे रुद्राक्ष संस्कृतीचे अभिमानी आपण बुद्धी देणाऱ्या देवतेपुढे मद्यधुंद होऊन नाचत आहोत, याची शरम वाटली पाहिजे !' गणेश मंडळांनी ठरवलं तर मद्य, मद्यपी यांना दूर ठेवता येणं अशक्य नाही. तसंच वर्गणीला खंडणीचं स्वरूप येऊ नये, म्हणून दाभोलकरांनी दातृत्वकलशाची कल्पना मांडली आहे. अपार्टमेंट, गल्ली, चाळ येथे एक कलश ठेवावा. लोकांनी स्वेच्छेने त्यात पैसे टाकावेत आणि उत्सवाच्या आधी जमा झालेली रक्कम सर्व मंडळांना समान वाटून द्यावी.

यासाठी दारी येणाऱ्यांना वर्गणी मिळणार नाही, हे सवार्नुमते ठरवावं. दाभोलकर म्हणत, 'माझं काम तुमच्या मेंदूमध्ये बुद्धिप्रामाण्यवादाचं, वैज्ञानिक दृष्टिकोनाचं बीज रोवणं, एवढंच आहे. एकदा ते बीज रोवलं गेलं, की तुमच्या मेंदूमधील सगळी जमीन सुपीक होईल !'

डॉ. नरेंद्र दाभोलकर विवेकवादी होते. सांगलीचे प्राचार्य पी.बी. पाटील हेही विवेकवादीच आहेत. गणेशविसर्जन हे बुद्धिदात्या गणेशाचं विसर्जन आहे, ते शांततेच्या वातावरणातच पार पडलं पाहिजे, हा आग्रह धरताना ते म्हणतात,

नव्या युगाचा नारा आहे- विद्या,
ज्ञान, संस्कृती सर्वांची ।
धन, मालमत्ता संपत्ती - सर्वांची।
सत्ता, प्रसिद्धी, प्रतिष्ठा सर्वांची ।

अर्थात, विवेकबुद्धी हीच जगाची नियंती शक्ती आहे म्हणून गणेश विसर्जनाबरोबर या विवेकबुद्धीचं विसर्जन होणार नाही, एवढी दक्षता घेत आपण म्हणू या-

बुद्धीने वागतो । तोच गणपती ।
करी तो आरती । स्वतःचीच ॥ १
बुद्धीचा विकास । हा ज्याचा ध्यास ।
त्यास नसे त्रास। पूजनाचा ॥२
न्यायाचा परशू । अंकुश मनाचा ।
त्यास आनंदाचा । मोदक लाभे ॥ ३
नाही आवाहन । नाही विसर्जन ।
व्यासंगात मन । रमे ज्याचे ॥४
नवे ज्ञानदाते । ग्रंथराज नवे ।
रमे त्यांच्यासवे । बुद्धिभक्त ॥५
बुद्धिमानापुढे । विघ्ने न थांबती ।
सर्व सुखे येती । पायांपाशी ॥६
अमृतही फिके । ज्ञानानंदापुढे ।
सुटे जन्म कोडे । आपसूक ॥७
सुखकर्ता व्हावे । दुःखहर्ता व्हावे ।
आपणाची व्हावे । बुद्धिदाता ॥८



**प्रा. डॉ. जे.बी. शिंदे**

# वैद्यकीय महाविद्यालयांना विद्यार्थ्यांकडून हमीपत्र लिहून घेण्याबाबत कोणतेही निर्देश नाहीत

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** शासकीय/महानगरपालिका/अनुदानित/खाजगी विनाअनुदानित आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या सर्व महाविद्यालयांना विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे हमीपत्र लिहून घेण्याबाबत निर्देश देण्यात आले नसल्याचे वैद्यकीय शिक्षण, संशोधन व 'आयुष'च्या आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या तसेच, विहित मागार्ने बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या एससी, एसटी ओबीसी, ईडब्ल्यूएस प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून प्रवगार्तील ज्या विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना १०० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून प्रवेशाच्यावेळी कोणतेही शिक्षण शुल्क न आकारता त्यांना प्रवेश देण्यात यावा असे निर्देश देण्यात आले आहे.

## वात्रटिका

### घुसमट

धाव धाव धावलो एवढा की
कधी कधीच दमलो नाही...
सुखरूप पोहोंचलो तिथे,
पण तिथे कधीच रमलो नाही...
याद येते पुन्हा काकांची
पण परत जाऊ शकत नाही...
बाणा ढळला कार्यकर्ता वळला
बळेबळे म्हणा मी झुकत नाही...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

